महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ 08 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 224 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




## रिझर्व्ह बँकेची व्याज दरात कपात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई – रिझर्व्ह बँकेने पाच वर्षांत पहिल्यांदाच रेपो दरात पाव टक्का कपात केली असून बँकांच्या कर्जावरील व्याज दर पाव टक्कयाने कमी झाल्याने प्रामुख्याने घरासाठी कर्ज घेतलेल्या ग्राहकांमध्ये आनंद पसरला आहे. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाचा एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होणार आहे. प्रामुख्याने खेळत्या भांडवलाची चणचण कमी होऊन बाजारातील खेळत्या भांडवलात वाढ होण्याची अपेक्षा आहे.रिझर्व्ह बँकेच्या सहा सदस्यीय पतधोरण समितीच्या आज झालेल्या बैठकीत व्याजदर कपातीचा हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार व्याजदरात २५ बेसीस पॉइंटने कपात करण्यात आली असून व्याजदर ६.५० टक्क्यांवरून ६.२५ टक्के झाला आहे. यापूर्वी बँकेने मे २०२० मध्ये व्याजदर कपात केली होती. शिवाय मागील दोन वर्षांत व्याज दर जैसे थे राखले होते.केंद्र सरकारने यावर्षी सादर केलेल्या अर्थसंकल्पात १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले. त्यानंतर आठवडाभरातच रिझर्व्ह बँकेने व्याजदरात कपात केल्यामुळे आगामी काळात गृह आणि वाहन कर्जे स्वस्त होणे अपेक्षित आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयात सातत्याने होणारी घसरण, सातत्याने वाढणारी महागाई या कारणांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर मंदावला आहे. बाजारात खेळत्या भांडवलाची चणचण जाणवत आहे. यावर उपाय म्हणून रिझर्व्ह बँकेने तारेवरची कसरत करत ही व्याजदर कपात केली आहे, असे अर्थतज्ज्ञांनी सांगितले.

## उल्हासनगरातील वीस वर्ष जुनी बेकायदा पार्किंग हटवली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : गेल्या 20 वर्षापासून शहाड रेल्वे स्थानकाजवळ चालवण्यात येणाऱ्या अवैध दुचाकी पार्किंगवर उल्हासनगर महानगरपालिका आणि आरटीओ यांनी संयुक्तिक कारवाई करून ही पार्किंग हटवली आहे. या कारवाईत एक लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती प्रभाग अधिकारी सहायक आयुक्त अलका पवार यांनी दिली. शहाड रेल्वे स्थानक परिसर या अवैध पार्किंगमुळे व्यापून गेला होता. त्यामुळे ही पार्किंग हटवून त्याजागी महानगरपालिकेच्या वतीने अधिकृत पार्किंगचा कॉंट्रॅक्ट सृष्टी इंटरप्राइजेसला देण्यात आला होता. यापूर्वी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना ही पार्किंग हटवण्यासाठी आदेश देण्यात आले होते. मात्र त्यात अधिकारीही चालढकलपणा करत असल्याने ही पार्किंग बिनबोभाटपणे सुरू होती. काही जण दुचाकी पार्किंग करणाऱ्यांकडून पैसे देखील घेत होते. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत होते.

## आज आणि उद्या मध्य व पश्चिम रेल्वे मार्गावर मेगाब्लॉक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मध्य रेल्वेकडून रविवारी विविध अभियांत्रिकी आणि देखभालीच्या कामासाठी मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. माटुंगा-मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी ११:३० ते दुपारी ३:३० पर्यंत हा ब्लॉक असणार आहे. ब्लॉक कालावधीत सीएसएमटीवरून सकाळी ११ ते दुपारी ३:१० या वेळेत सुटणाऱ्या डाऊन जलद सेवा माटुंगा स्थानकात लोकल धीम्या मार्गावर वळवण्यात येणार आहेत. मुलुंड स्थानकातून या लोकल पुन्हा जलद मार्गावर वळवल्या जातील. हार्बर मार्गावरील सीएसएमटी ते चुनाभट्टी/वांद्रे दरम्यान सकाळी ११.१० ते दुपारी ४.४० पर्यंत अप आणि डाउन हार्बर मार्गावर मेगाब्लॉक असणार आहे. त्यामुळे या कालावधीत सीएसएमटी ते पनवेल आणि वांद्रे गोरेगाव सेवा रद्द राहतील. मात्र या कालावधीत पनवेल-कुर्ला-पनवेल दरम्यान विशेष सेवा चालवल्या जातील. तसेच हार्बर मार्गावर प्रवाशांना सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुख्य मार्गावर आणि पश्चिम रेल्वे मार्गाच्या स्टेशनवरून प्रवास करण्याची परवानगी आहे. या कालावधीत सीएसएमटी – वाशी/बेलापूर/पनवेल अप आणि डाऊन मार्गावरील लोकल रद्द करण्यात येणार आहेत. ब्लॉक कालावधीत पनवेल- कुर्ला – पनवेलदरम्यान विशेष लोकल सेवा चालविण्यात येणार आहेत. हार्बर मार्गावरील प्रवाशांना सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुख्य मार्गिका आणि पश्चिम मार्गिकेवरून प्रवास करण्यास परवानगी देण्यात आली आहे.



# सरकारचा उद्योगधार्जिणा निर्णय

## औद्योगिक वापरासाठी एनएची अट रद्द

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई : राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारने आणखी एक उद्योगस्नेही निर्णय घेतला आहे. औद्योगिक जमिनीचा वापर करावयाचा असल्यास त्यासाठी बिगरशेती (एनए) परवानगी आवश्यक असणार नाही. याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत बदल करण्यात येणार आहे.**

भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या व्यापार सुलभता (इज ऑफ डुईंग बिझनेस) या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. ते म्हणाले, यापूर्वी जमीनधारकांना औद्योगिक वापरासाठी मानीव अकृषिक वापराची परवानगी घेणे आवश्यक होते; परंतु, त्यासाठी लागणारा वेळ हा जमीन एनए करण्यासाठी लागणाऱ्या वेळेएवढाच आहे, हे शासनाच्या निदर्शनास आल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

जमिनीचा उद्योगासाठी वापर करावयाचा असल्यास परवानगीची तरतूद रद्द होण्यासाठी काही काळाचा अवधी लागणार असल्याने तोपर्यंतच्या कालावधीत एखाद्याला जमीन उद्योगासाठी वापरायची असल्यास त्यालाही एनए परवानगी घेणे आवश्यक नाही. त्यासाठी या उद्योग घटकाने सक्षम नियोजन प्राधिकरणाकडून विकास परवानगी घेतल्यानंतर किंवा नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम आराखडे मंजूर करून घेतल्यानंतर त्याची नोंद करण्यासाठी संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे (तलाठी) जावे. त्यानंतर त्या ग्राम महसूल अधिकाऱ्याने लवकरात लवकर ती नोंद त्याच्या दप्तरात करावी, असेही या परिपत्रकात म्हटले आहे. औद्योगिक जमिनीसाठी एनएची आवश्यकता असणार नाही. तसेच, वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# राज्यातील नद्यांची बिकट अवस्था

## राज्यपालांकडून चिंता व्यक्त




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नाशिक : गोदावरीसह काही नद्यांची अवस्था बिकट आहे. पाण्याचा दर्जा निकृष्ट असल्याने त्यात स्नान करणेही हानीकारक ठरू शकते. नद्यांचे संरक्षण न झाल्यास भविष्यात मानवी जीवन संकटात येईल, असा धोका राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

श्रीरामतीर्थ गोदावरी समितीच्यावतीने शुक्रवारी सायंकाळी गोदाघाटावर गोदा आरती आणि पुरस्कार वितरण सोहळा राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. प्रारंभी त्यांनी गंगापूजन केले. यावेळी जल व पर्यावरण तज्ज्ञ महेश शर्मा यांना गोदावरी राष्ट्र जीवन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थितांशी संवाद साधताना राज्यपालांनी नद्यांच्या दुरावस्थेवर बोट ठेवत चिंता व्यक्त केली. गोदाकाठावर आपण उत्साहात जमलो, परंतु, नदीची अवस्था बिकट आहे. औद्योगिक वसाहती व शहरातील सांडपाणी नदीत मिसळते. ज्या नद्यांवर आपले जीवन अवलंबून आहे, त्यांचे जीवन अडचणीत येत आहे. कधीकाळी मुंबईतून पाच नद्या वाहत होत्या. त्या नष्ट होऊन आता केवळ मिठी नदी शिल्लक आहे. तिचे स्वरुपही नाल्यासारखे झाल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. मुंबई व दिल्लीसारख्या महानगरांमध्ये प्रदूषणाची समस्या चिंताजनक आहे. समाजाने नद्यांचे संरक्षण, त्यांना प्रदूषणमुक्त करण्यासाठी एकत्र येण्याची आवश्यकता राधाकृष्णन यांनी मांडली. यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, समितीचे अध्यक्ष जयंत गायधनी, उपाध्यक्ष शांताराम भानोसे आदी उपस्थित होते.

## मुंबई बाजार समिती पदाधिकारी निवडणूक

# दोन आठवड्यात घ्या !

### – उच्च न्यायालयाचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवड दोन आठवड्यात घ्या असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या दोन सदस्यीय खंडपीठाने दिले आहेत. सन २०२२ मध्ये सभापती, उपसभापती यांनी आपत्र ठरल्याने राजीनामा दिला होता, त्यामुळे ही पदे गेल्या दोन वर्षांपासून रिक्त असून तोपर्यंत सभापती अशोक डक काळजीवाहू सभापती म्हणून कार्यभार पाहत आहेत. ऑगस्टमध्ये या संचालक मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात येत असून पुन्हा नव्याने निवडणुका होतील. त्यामुळे औक घटकेसाठी या सभापतींची निवडणूक होणार की शासन संचालक मंडळ बरखास्त करणार अशी चर्चा बाजारात सुरु आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एकुण २७ संचालक असतात. सहा महसूल विभागांतील प्रत्येकी दोन शेतकरी प्रतिनिधी, वाशीतील कांदा बटाटा बाजार, भाजीपाला,फळ, धान्य आणि मसाला बाजारातून प्रत्येकी एक असे पाच संचालक तर माथाडी, हमाल, कामगारांमधून एक संचालक निवडला जातो. अशी १८ जणांची निवडणूक होते. राज्यातील ३०६ बाजार समित्यांची शिखर संस्था असलेल्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक फेब्रुवारी २०२० मध्ये बाजार समितीची निवडणूक घेण्यात आली होती. तर २ मार्च २०२० रोजी निकाल लागला होता. याआधी एपीएमसी बाजार समितीवर २०१३ ते २०२० असे सलग सात वर्ष प्रशासक राजवट होती. मात्र निकाल लागताच देशात करोना संक्रमण आले आणि टाळेबंदी जाहीर झाली. त्यामुळे संचालक मंडळाच्या बैठकी अभावी सभापतींची नियुक्ती लांबवणीर गेली. ३१ ऑगस्ट २०२० संचालक मंडळाच्या बैठकीत बीडचे शेतकरी प्रतिनिधी अशोक डक यांची सभापतीपदी निवड करण्यात आली. त्यामुळे निकाल मार्च २०२० मध्ये लागला तरी संचालक मंडळांचा कार्यकाळ हा ऑगस्ट २०२० पासून ग्राह्य धरण्यात आलेला आहे. मात्र आता उच्च न्यायालयाने येत्या काही आठवड्यांमध्ये सभापती, उपसभापतीची निवडणूक घेण्या आदेश दिले आहेत.

## आरोग्य केंद्रे हस्तांतरण वाद

# वसई विरारमधील रुग्ण ग्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : मागील नऊ वर्षांपासून जिल्हा परिषदेची पालिकेच्या हद्दीत येत असलेली आरोग्य केंद्र हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अजूनही हा तिढा सुटला नसून त्या वादाचा फटका रुग्णांना बसू लागला आहे. तर दुसरीकडे हस्तांतरण वादामुळे या आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीकडे ही लक्ष दिले जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वसईत जिल्हा परिषदेची आठ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत आणि ३२ उपकेंद्रे आहेत. यातील काही आरोग्य केंद्र पालिका स्थापन झाल्यानंतर पालिकेच्या हद्दीत येत आहेत. वाढते नागरीकरण लक्षात घेता पालिकेने ३ आरोग्य केंद्र आणि १२ उपकेंद्र ही पालिकेकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया २०१५ पासून सुरू आहे.त्यानंतर शासनाच्या आरोग्य खात्याने २०२० मध्ये पत्रक जारी करून सोपारा, निर्मळ, चंदनसार ही तीन आरोग्य केंद्र व नायगाव , सांडोर, उमेळा, पेल्हार, चंदनसार, सातीवली, वालीव , जूचंद्र, वालीव, चिखलडोंगरी, बोळींज ही बारा हस्तांतरण करण्याबाबत सूचना केल्या होत्या.त्यानंतर पालिकेकडून हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या हस्तांतरणाच्या प्रक्रिये दरम्यान ही जागा व त्याचा मोबदला, आरोग्य कर्मचारी असे अनेक प्रश्न उपस्थित होत असल्याने हा प्रश्न अजूनही मार्गी लागला नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

# हरित लवादाकडून ठाणे मनपाला नोटीस !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या घोडबंदर पट्ट्यातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या भागात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर कचरा टाकणे ठाणे महापालिकेला भोवले आहे. या प्रकरणात राष्ट्रीय हरित लवादाकडून ठाणे महापालिकेला नोटीस बजावण्यात आली आहे.

ॲड. वैभव साटम यांनी यासंदर्भात हरिद लवादाकडे दाद मागितली होती. ठाणे महापालिकेकडून आता यासंदर्भात स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे. ठाण्यातील गायमुख जकात नाका, घोडबंदर रोड परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असून हे संपूर्णतः पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ तटीय नियमन क्षेत्र अधिसूचना २०११ तसेच इको-सेंसिटिव्ह झोन मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन आहे. या परिसरात बेकायदेशीर कचरा टाकण्यामुळे या भागातील नैसर्गिक संपदा धोक्यात आली असून, येथील जैवविविधता, जलस्रोत आणि वन्यजीव धोक्यात आले असल्याची बाब ॲड. वैभव साटम यांनी राष्ट्रीय हरित लवादाच्या निदर्शनास आणून दिली.

ठाणे महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र तटीय झोन व्यवस्थापन प्राधिकरण आणि मीरा-भाईंदर महानगरपालिका यांना यापूर्वीच कायदेशीर नोटीस, छायाचित्रे आणि तक्रारी सादर करण्यात आल्या होत्या. मात्र तरीही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवरच वैभव साटम यांनी गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. बेकायदेशीर कचरा टाकण्याची प्रक्रिया त्वरित थांबवावी, जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करावी व दंडात्मक उपाययोजना कराव्यात, पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, महापालिकेने या संदर्भात झालेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल सादर करावा, अशी मागणी वैभव साटम यांनी राष्ट्रीय हरित लवादाच्या नोटीसनंतर पालिका प्रशासनाकडे केल्या आहेत.

महापालिका व पर्यावरण विभाग यांचे वारंवार दुर्लक्ष आणि निष्क्रियता यामुळे समोर आली असून जर तातडीने योग्य कारवाई झाली नाही, तर जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर प्रक्रिया राबवावी, महापालिका आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी ठरवावी आणि ठाणे शहरातील पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी तक्रारदारांकडून करण्यात आली आहे.

# मुंबईत जीबीएसचा पहिला रुग्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पुण्यासह राज्याच्या काही जिल्ह्यांमध्ये थैमान घालणाऱ्या गुइलेन-बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) लागण अंधेरी (प.) येथील सोनार चाळीमध्ये राहणाऱ्या एका महिलेला झाली आहे. या ६४ वर्षीय महिलेला ५ फेब्रुवारी रोजी मुंबई महानगरपालिकेच्या सेव्हन हिल रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मुंबईमध्ये सापडलेला हा पहिला जीबीएसचा रुग्ण असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

अंधेरी पश्चिमेला असलेल्या मालपा डोंगरी येथील सोनार चाळीत राहणाऱ्या ६४ वर्षीय लक्ष्मी पांडुरंग जाधव यांना १५ दिवसांपूर्वी ताप आणि डायरियाचा त्रास सुरू झाला होता. तसेच त्यांना चालताना त्रास होत होता. मात्र मागील तीन दिवसांपूर्वी त्यांना पक्षाघात झाला. त्यांना ५ फेब्रुवारी राजी अंधेरीतील मुंबई महानगरपालिकेच्या सेव्हन हिल रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. विविध तपासण्या करून तिच्यावर तातडीने अतिदक्षता विभागात उपचार सुरू करण्यात आले. त्यांच्या मेंदूमध्ये पांढरे डाग दिसत आहेत. त्यांच्यावर प्लाझ्मा उपचार पद्धती सुरू करण्यात आली आहे. या पद्धतीच्या अजून चार फेऱ्या शिल्लक आहेत, अशी माहिती सेव्हन हिल रुग्णालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

मुंबईमध्ये सापडलेला हा पहिला जीबीएसचा रुग्ण असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. असे असले तरी मुंबईमध्ये अधूनमधून जीबीएसचे नियमित रुग्ण सापडत असल्याने हा पहिला रुग्ण असण्याची शक्यता रुग्णालयातील अधिकाऱ्याकडून फेटाळण्यात आली आहे.

राज्यामध्ये अद्यापपर्यंत जीबीएसचे १७३ संशयित रुग्ण सापडले असून, यापैकी १४० रुग्णांना जीबीएसची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच जीबीएसमुळे एकाचा मृत्यू झाला असून, पाच जणांच्या मृत्यूची संशयित म्हणून नोंद करण्यात आली आहे. राज्यातपुणे महानगरपालिकेच्या हद्दीत सर्वाधिक १३४ रुग्ण सापडले असून, पिंपरी चिंचवडमध्ये २२, पुणे ग्रामीण २२ व अन्य जिल्ह्यांमध्ये आठ रुग्ण सापडले आहेत. यापैकी ७२ जणांना रुग्णालयातून घरी पाठविण्यात आले आहे. तर ५५ रुग्ण अतिदक्षता विभागामध्ये असून, २१ रुग्ण जीवन रक्षक प्रणालीवर आहेत.

राज्यात सापडलेल्या रुग्णांमध्ये ० ते १९ वयोगटामध्ये ४६ रुग्ण, २० ते २९ वयोगटात ३८ रुग्ण , ३० ते ३९ वयोगटात २१ रुग्ण, ४० ते ४९ वयोगटात २२ रुग्ण, ५० ते ५९ वयोगटात २५ रुग्ण, ६० ते ६९ वयोगटात १५ रुग्ण, ७० ते ८९ वयोगटात ६ रुग्ण सापडले आहेत. दरम्यान, मुंबईमध्ये सापडलेल्या संशयित जीबीएस रुग्णाचा पुण्यातील रुग्णांशी काहीही संबंध नसून, या महिलेने कुठेही प्रवास केला नसल्याचे मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कार्यकारी अधिकारी डॉ. दक्षा शाह यांनी सांगितले.

# गीतासार



यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ।
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥२- ४२॥

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥२- ४३॥

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥२- ४४॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), जे भोगात रमलेले असतात, कर्मफलाची स्तुती करणाऱ्या वेदवाक्यांची ज्यांना आवड आहे, ज्यांच्या मते स्वर्ग हीच श्रेष्ठ मिळवण्याजोगी वस्तू आहे, स्वर्गाहून श्रेष्ठ दुसरी कोणतीही गोष्ट नाही, असे जे सांगतात, ते अविवेकी लोक अशा प्रकारची जी पुष्पित म्हणजे दिखाऊ शोभायुक्त भाषा बोलतत असतात, त्यांची ही भाषा जन्मरूप कर्मफळ देणारी तसेच भोग व ऐश्वर्य मिळवण्यासाठी अनेक प्रकारच्या क्रियांचे वर्णन करणारी असते. या भाषेने ज्यांचे अंतःकरण आकृष्ट करून घेतले आहे, जे भोग व ऐश्वर्यात अत्यंत आसक्त आहेत, अशा पुरुषांची परमात्म्याविषयी निश्चयी बुद्धी असत नाही. ॥ २-४२, २-४३, २-४४ ॥

# क्रीडाविश्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला

ज्यांचे क्रीडा विषयक लेख वाचत मी लहानाचा मोठा झालो. ज्यांच्या लेखाने माझे क्रिकेट विश्वातील ज्ञान वृद्धिंगत झाले. ज्यांच्या लेखणीतून प्रेरणा घेऊन मी क्रीडा विषयक लेख लिहू लागलो असे ज्येष्ठ क्रीडा समीक्षक, लेखक, स्तंभलेखक द्वारकानाथ संझगिरी यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी गुरुवारी ( ६ फेब्रुवारी ) रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने कोट्यवधी क्रिकेट रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा क्रीडाविश्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते त्या संदर्भात त्यांनी एक फेसबुक पोस्ट देखील लिहिली होती मात्र ते असे इतक्या लवकर जातील असे वाटले नव्हते. शालेय जीवनात असतानाच द्वारकानाथ संझगिरी हे नाव तोंडपाठ झाले होते. भारतीय संघाचा क्रिकेट सामना असला की त्या दिवशी सकाळी आणि क्रिकेट सामना संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी सामन्यावर विश्लेषण करणारे वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचणे हा माझा आवडता उद्योग. त्यांचे क्रिकेट वरील ज्ञान तर अफलातूनच होते. सध्याच्या क्रिकेटवर भाष्य करतानाच ते आपल्याला भूतकाळात घेऊन जात अगदी पन्नास वर्षांपूर्वीच्या सामन्याचा किंवा खेळाडूंचा संदर्भ त्यांच्या लेखात असे. त्यांचा इतके क्रिकेटचे ज्ञान असलेले लेखक विरळच. केवळ वर्तमानपत्रातच नाही तर दूरचित्रवाणीवर देखील ते क्रिकेटचे समीक्षण करत. जवळपास पाच दशके क्रिकेटवर लेखन करून क्रिकेटप्रेमींना नवी दृष्टी देणाऱ्या द्वारकानाथ संझगिरी यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९५० रोजी मुंबईतील दादर येथे झाला. मुंबईत शालेय शिक्षण घेतल्यावर त्यांनी माटुंग्याच्या व्हिक्टोरिया ज्युबली कॉलेजमधून इंजिनीरिंगचे शिक्षण पूर्ण केले. इंजीअरिंग केल्यावर त्यांनी मुंबई महपालिकेत अभियंता म्हणून नोकरीही केली पण क्रिकेट व साहित्यातील रूचीमुळे त्यांच्यातील क्रिकेट समीक्षक घडवला. क्रिकेटवर त्यांनी केलेले लेखन विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होऊ लागले. त्यांच्या लिखाणाला क्रिकेटप्रेमींनी नेहमीच पसंतीची दाद दिली. केवळ मराठीच नाही तर इंग्रजी आणि हिंदी दैनिकातून आणि साप्ताहिकातूनही ते लिहू लागले. त्यांनी अनेक क्रीडापटुंच्या मुलाखती घेतल्या. क्रीडापटुंची मुलाखत घेण्याची त्यांची एक विशिष्ट शैली होती. ते क्रीडापटुंची मुलाखत घेत आहेत असे वाटतच नव्हते त्यांची मुलखात म्हणजे



गप्पांचा कार्यक्रमच वाटत असे इतके मनमोकळेपणे क्रीडापटू त्यांच्यापुढे व्यक्त होत. केवळ क्रिकेट किंवा क्रीडाविषयकच नव्हे तर चित्रपट, प्रवास, पर्यटन आणि सामाजिक विषयांवर देखील त्यांनी विपुल लेखन केले . द्वारकानाथ संझगिरी यांनी १९८३ पासून २०११ पर्यंत झालेल्या सर्व क्रिकेटच्या विश्वचषकांचे त्या देशात जाऊन वार्तांकन केले. द्वारकानाथ संझगिरी यांनी क्रिकेटर्स आणि चित्रपट तारे तारकांवर अनेक कार्यक्रम केले. त्या कार्यक्रमाच्या निवेदनाची धुरा तेच सांभाळीत.

द्वारकानाथ संझगिरी यांनी जवळपास ५० पुस्तके लिहिली. त्यातील शतकात एकच सचिन, चिरंजीव सचिन, दिलखुलास बातचीत क्रिकेटपटूंशी, खेलंदाजी, बोलंदाजी, चॅम्पियन्स, चित्तवेधक विश्वचषक २०२३, क्रिकेट कॉकटेल, क्रिकेट वर्ल्डकप हाय लाईट, कथा विश्वचषकाच्या, लंडन ऑलिम्पिक, पॉवर प्ले, स्टंप व्हिजन, संवाद लिजेंडशी, क्रिकेट गाथा, थर्ड अंपायर, इंग्लिश ब्रेकफास्ट ही त्यांची पुस्तके क्रीडाप्रेमींना खूप आवडली. द्वारकानाथ संझगिरी यांना अनेक पुरस्कार मिळाले त्यात दत्ता हलसगीकर साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य संघाचा उत्कृष्ट लेखक पुरस्कार, विद्याधर गोखले साहित्य पुरस्कार, क्रीडाविषयक लेखनासाठी विश्वनाथ वाबळे पुरस्कार, वृत्तपत्र लेखन संघाचा पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. त्यांच्या निधनाने क्रीडाविश्वासह साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे विविधांगी लेखन कायम स्मरणात राहील. स्तंभलेखक, समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# 'कर्करोग तपासणी वाहन' लोकार्पण सोहळा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने दि.४ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या जागतिक कर्करोग दिनाच्या अनुषंगाने राज्यात पुढील महिनाभर कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम राबविली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत कर्करोग तपासणी करिता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या "कर्करोग तपासणी वाहनांचा लोकार्पण सोहळा" उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्य मंत्री प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर, सार्वजनिक आरोग्य विभाग व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र शासन तसेच जिल्ह्यातील इतर मंत्री महोदयांच्या उपस्थितीत दि.९ फेब्रुवारी २००५ रोजी नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे संपन्न होणार आहे.

तरी नागरिकांनी, प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर यांनी केले आहे.

# बी.एड, एम.एड अभ्यासक्रमासाठी सी ईटी परीक्षा मुदतवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : एमबीए / एमएमएस आणि एमसीए, बी-एचएमसीटी / एम एचएमसीटी इंट्रीग्रेटेड, बी-डिझाईन, एम-एचएमसीटी, विधि पाच वर्ष अभ्यासक्रमांच्या अर्ज नोंदणीला मुदतवाढ दिल्यानंतर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) बीएड-एमएड या अभ्यासक्रमाच्या अर्ज नोंदणीला मुदतवाढ दिली आहे. विद्यार्थ्यांना १८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज नोंदणी करता येणार आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांना अधिकाधिक विद्यार्थ्यांना अर्ज करता यावेत, यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यात ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेला सुरुवात केली. सर्व अभ्यासक्रमांना नोंदणीसाठी एक महिन्यांची मुदत देण्यात आली होती. मात्र विद्यार्थ्यांकडून अल्प प्रतिसाद मिळत असल्याने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने अर्ज नोंदणीस मुदतवाढ देण्यात आली. बीएड-एमएड या अभ्यासक्रमाच्या अर्ज नोंदणी प्रक्रियेला ६ जानेवारीपासून सुरूवात करण्यात आली होती. एक महिन्याच्या कालावधीत बीएड-एमएड या अभ्यासक्रमासाठी राज्यभरातून ७०० विद्यार्थ्यांनी शुल्क भरून अर्ज निश्चित केले आहेत.

# बेहेरे-खडवली ग्रामपंचायत उपसरपंच पदी जगन कडव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : बेहेरे-ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदि जगन कडव याची बिनविरोध निवड करण्यात आली आहे, उपसरपंच पदा करीता जगन कडव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता,निवडणूक अधिकारी तथा सरपंच प्रियांका राऊत यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली,यावेळी ग्रामपंचायत सदस्य दिपाली शेलार, चेतन शेलार,वनिता लांगे, अनिल



बांगर,नितीन गोरे,शोभा चव्हाण, चतुरा गायकवाड, गिता कडव,नरेश कथोरे, दर्शना जाधव, प्रियांका भोईर, स्वाती शेलार ,तसेच ग्रॉमविकास अधिकारी बी बी पष्टे उपस्थित होते,, उपसरपंच पदा साठी जगन कडव याचा एकच अर्ज दाखल झाला होता, निवडणूक अधिकारी तथा सरपंच प्रियांका राऊत यांनी उपसरपंच पदि जगन कडव याची निवड झाल्याची जाहीर केली, यावेळी शुभेच्छा देण्यासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरुण पाटील, शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे,माजी सरपंच मंगेश शेलार,,रमेश लोणे, दिपक भोईर,बाळा बोरसे,चौधरी सर,गिरीश भोईर, योगेश मोकाशी,गजानन कडव,अमोल कथोरे,यांच्या सह आजी माजी सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरिता ऑनलाईन नोंदणी सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : एकीकडे बेरोजगारी वाढत आहे तर दुसरीकडे चांगले मनुष्यबळ अनेक आस्थापनांमध्ये, कंपन्यांमध्ये मिळत नाही. अशा परिस्थितीत उमेदवारांचे कौशल्य विकसित होणे आवश्यक आहे. उद्योजक घडल्यास ते काही लोकांना रोजगार देऊ शकतात. त्यामुळे बेरोजगारी कमी होण्यासाठी मदत होते. उद्योजकांना चांगले कर्मचारी मिळावेत, तसेच इच्छुक बेरोजगारांना काम मिळावे, यासाठी शासनाच्या वतीने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ही योजना सुरू करण्यात आली असून उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://www.cmykpy.mahaswayam.gov.in/ संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अ.मु.पवार यांनी दिली आहे. उमेदवारांना उद्योजकाकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम योजना आपल्यासाठी करणे, हा या योजनेचा उद्देश आहे. उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) द्वारे उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येते. तो कुशल, अनुभवी झाल्यानंतर त्याला चांगल्या संधी उपलब्ध होतात. रायगड जिल्ह्यातील खाजगी आस्थापनांनी त्यांच्या मनुष्यबळाच्या उत्पादन क्षेत्रासाठी 10 टक्के व सेवाक्षेत्रासाठी 20 टक्के रिक्तपदे अधिसुचित करावीत. वैशिष्ट्ये : https://www.cmykpy.mahaswayam.gov.in/ या संकेतस्थळावर Intern Login मध्ये बारावी, आय.टी. आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार ऑनलाईन नोंदणी करू शकतील. विविध क्षेत्रातील मोठे प्रकल्प, उद्योग/स्टार्टअप्स, विविध आस्थापना आदींना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी ऑनलाईन नोंदविली जाते.- सुमारे 10 लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) च्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतात. शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विद्यावेतन (प्रतिमहिना), 12 वी पास- 6 हजार, आय. टी. आय./पदविका- 8 हजार, पदवीधर / पदव्युत्तर-10 हजार, या कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) चा कालावधी 6 महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल. विद्यावेतन लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येईल. उमेदवारांची पात्रता:- उमेदवाराचे किमान वय 18 व कमाल 35 वर्षे असावे. किमान शैक्षणिक पात्रता 12 वी पास/ आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर असावी. तो महाराष्ट्राचा अधिवासी असावा. आधार नोंदणी असावी. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या 02141-222029 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# डोंबिवलीत मोफत कोर्सेस सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


डोंबिवली : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार श्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त डोंबिवली लाईट हाऊस आणि डोंबिवली शिवसेना शहर मध्यवर्ती शाखेतर्फे 22 दिवसांचा फाउंडेशन कोर्स नंतर करता येणारे स्किनिंग कोर्सेस त्यामध्ये एसी फ्रिज रिपेरिंग ऑफिस एक्झिक्यूटिव्ह अकाउंट एक्झिक्युटिव्ह ग्राफिक डिझाईनिंग



डिजिटल मार्केटिंग मोबाईल रिपेरिंग डेव्हलपमेंट हार्डवेअर नेटवर्किंग सोलर टीव्ही रूट स्टॉप आणि ऑटोकॅड सीएनसी ऑपरेटर मेकॅनिक इत्यादी मोफत कोर्सेस शिकवले जातील काही अत्यल्प दरात नर्सिंग असिस्टंट आयटी कोर्स पायथन जावा फूड स्टॉप ब्युटी पार्लर औद्योगिक कौशल्य आयआयटी असे अनेक कोर्सेस शिकवले जातात आणि त्यांना नोकरीची आणिक व्यवसायाची पण हमी देत आहे. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या मार्गदर्शनाने आणि कविता गावं विवेक खामकर पाटील गजानन व्यापारी वैभव राणे शिल्पा मोरे प्रतिभा पांचाळ आणि आणि अनिता मयेकर इत्यादी डोंबिवली शिवसेना शाखेतील पदाधिकारी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम होत आहे.

## रेसिपी

# रेस्टॉरंटस्टाइल व्हेज कोल्हापुरी



**साहित्य**

बटाटा - 1,सिमला मिरची - 1,फ्लॉवर - अर्धा,टोमॅटो -1,गाजर -1,आल्याचा तुकडा,मटार- वाटीभर,किसलेलं खोबरं - वाटीभर,तीळ,लाल मिरची -1 ते 2,लाल तिखट,धणे पावडर,गरम मसाला,हळद,जिरं,मीठ

**कृती**

सर्वात आधी सर्व भाज्या धुवून त्याचे काप करावेत.

यानंतर मिक्सरमध्ये टोमॅटो, हिरवी मिरची, आल्याचा तुकडा बारीक करून घ्यावे.

कढईत तेल गरम करुन त्यात बटाटे, फ्लॉवर, गाजर, सिमला मिरची टाकून सोनेरी रंगाचे होईपर्यंत परतून घ्यावेत.

दुसरीकडे एक पॅन गरम करण्यास ठेवा. त्यात तीळ, जिरे, किसलेले खोबरं हलके भाजून घ्यावेत.

सर्व मिश्रण थंड झाल्यावर मिक्सरमध्ये बारीक करून घ्यावे.

पुन्हा कढईत तेल गरम करून घ्या. तेल गरम झाल्यावर हिंग, हळद, धणे पूड टाकून परतून घ्यावे.

आता यात टोमॅटो आणि सर्वाची पेस्ट मिक्स करावी.

आवश्यकतेनुसार लाल तिखट, गरम मसाला चवीनुसार मीठ टाकावे.

मसाल्याला तेल सुटले की, त्यात मटार, तळलेल्या भाज्या घाल्याव्यात.

यानंतर भाजी 4 ते 5 मिनिटे शिजू द्यावी.

तुमची व्हेज कोल्हापूरी तयार झाली आहे.

फक्त सर्व्ह करण्याआधी चिरलेली कोथिंबीर भाजीवर गार्निशींगसाठी टाकावी.

# 'कॉपीमुक्त परीक्षा' पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील सन २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा २१ फेब्रुवारी२०२५ व बारावी बोर्ड परीक्षा ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी सुरू होणार आहे. जिल्हा प्रशासनामार्फत 'कॉपीमुक्त परीक्षा' पार पाडण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तरी विद्यार्थ्यांनी या परीक्षेस सामोरे जाताना कॉपीमुक्त परीक्षा व भयमुक्त परिक्षेस सामोरे जावे, असे आवाहन राज्याचे मुख्य सचिव तथा पालक सचिव , ठाणे जिल्हा सुजाता सौनिक व दक्षता समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

जिल्ह्यात दहावी करिता ३३८ परीक्षा केंद्र असून १ लाख ३ हजार ७१८ तर बारावी परीक्षा करिता १९७ परीक्षा केंद्र असून १ लाख २१ हजार २४४ विद्यार्थी परिक्षेस प्रविष्ठ होत आहेत. परीक्षा कामकाज २० परिरक्षक केंद्रामार्फत होणार आहे.

शिक्षण विभागाच्या अंतर्गत भरारी पथक व आवश्यकतेप्रमाणे बैठे पथक नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच तालुका व मनपा स्तरावरून स्वतंत्रपणे भरारी व बैठे पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. महसूल विभागांतर्गत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरारी पथके नेमण्यात आली आहे. या व्यतिरिक्त जिल्हा स्तरावरील खाते प्रमुख यांनी परीक्षा केंद्राना भेटी देण्यासंदर्भांत नियोजन करण्यात आले आहे.

परिक्षादरम्यान कॉपी अथवा इतर गैरप्रकार निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे तरी विद्यार्थी व पालकांनी दक्षता घ्यावी तसेच परीक्षा केंद्रावर गैरप्रकार निदर्शनास आल्यास परीक्षा केंद्र कायम स्वरुपी रद्द करण्यात येईल अशा सूचना प्रशासनामार्फत देण्यात आलेल्या आहेत.

तसेच परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक व पर्यवेक्षक म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांचे डिजिटल माध्यमातून फेसियल उपस्थिती घेण्यात येणार आहे.

'कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न म्हणून खालील बाबीची दक्षता घेण्यात येणार आहे

१. जिल्ह्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये आवश्यकता असल्यास जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येईल.

२. परीक्षा सुरू होण्याअगोदर परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध असण्याबाबत दक्षता घेण्यात येणार आहे

३. परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यकतेनुसार व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येईल.

४. जिल्हयातील सर्व विभागाचे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व आवश्यकतेप्रमाणे बैठी पथके उपलब्ध होतील याचे नियोजन करण्यात आले आहे

५. Maharashtra Prevention of Malpractices Act 1982 या कायद्याची अंमलबजावणी करावी व कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येणार आहे

६. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात आवश्यकतेप्रमाणे १४४ कलम लागू करण्यात येईल.

परीक्षेशी संबंधित घटकांनी नियमबाह्य पद्धतीने मोबाईल अथवा तत्सम इलेक्ट्रॉनिक्स् उपकरणे परीक्षा केंद्रामध्ये घेऊन जाऊ नयेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यार्थी व पालकांनी सहकार्य करावे. अशी माहिती जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात आली आहे. सर्व विद्यार्थी व पालक यांना इयता दहावी व बारावी परीक्षेसाठी राज्याच्या मुख्य सचिव तथा पालक सचिव ठाणे जिल्हा सुजाता सौनिक व जिल्हा प्रशासनाकडून शुभेच्छा!!

# रायगड जिल्ह्यात सापडले कुष्ठरोग रुग्ण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यात कुष्ठरोग निमुर्लन मोहिमेतंर्गत करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात ४७९ कुष्ठरोगी आढळून आले आहेत. आदिवासी बहुल तालुक्यात कुष्ठरोगाचे प्रमाण अधिक आहे. महत्वाची बाब म्हणजे १५ पैकी १३ तालुक्यात कुष्ठरोगाचे प्रमाण नियंत्रित मानकापेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे. पेणच्या वरवणे आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थिनीला कुष्ठरुग्ण घोषित करण्यात आले होते. तिला कुष्ठरोग झालाच नव्हता असा दावा करीत चुकीच्या औषधोपचारामुळे मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या पालकांनी केला. त्यानंतर जिल्ह्यातील कुष्ठरुग्णांचा मुद्दा चर्चेत आला.जिल्ह्यातील कुष्ठरुग्णांच्या संख्येवर नजर टाकली तर परिस्थिती चांगली नसल्याचे समोर येत आहे. तर आदिवासींची लोकसंख्या जास्त असलेल्या तालुक्यात गंभीर स्थिती असल्याचे आकडेवारी सांगते. आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार दर दहा हजार लोकसंख्येमागे



कुष्ठरुग्णांचे प्रमाण १ पेक्षा कमी असेल तर स्थिती नियंत्रणात असल्याचे मानले जाते. परंतु, रायगडमधील १५ पैकी १३ तालुक्यांमध्ये १० हजार लोकसंख्येमागे हे प्रमाण एक किंवा त्यापेक्षा अधिक असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. जिल्ह्यात क्रियाशील कुष्ठरुग्णांची संख्या ४७९ इतकी आहे. कर्जत तालुक्यात सर्वाधिक ७६ रुग्ण आहेत. तर सुधागड तालुक्यातील दर दहा हजारी ४.४ ही रुग्णसंख्या चिंताजनक आहे.

शासनाने कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत नवीन रुग्णशोध मोहीम हाती घेतली आहे. यातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण सापडत आहेत. नवीन रुग्णांमध्ये मुलांची संख्या ६२ आहे तर २११ महिला कुष्ठरुग्ण सापडल्या आहेत. यातील मुलांची संख्या देखील चिंताजनक आहे. महिलांमध्ये आजार लपवून ठेवण्याची प्रवृत्ती अधिक असते. शासनाने कुष्ठरुग्ण शोध मोहीम राबवल्यामुळे रुग्णांची संख्या समोर आली आहे अन्यथा हे रुग्ण समोर आलेच नसते. त्यामुळे वाढत्या रुग्णसंख्येमुळे घाबरण्याचे कारण नाही, असे आरोग्य विभागाचे म्हणणे आहे.

रायगड जिल्ह्यात सध्या कुष्ठरुग्ण शोध अभियान पुरू आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील ५ लाख १६ हजार घरांना आशा व आरोग्य कर्मचारी भेट देणार असून २३ लाख लोकसंख्येचे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी २ हजार १०० पथके तयार करण्यात आली आहेत. ४०३ पर्यवेक्षकांच्या माध्यमातून मोहिम राबविण्यात येत आहे.




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# लाडकी बहीण योजनेतून अपात्र लाभार्थ्यांना वगळले

## या महिलांना योजनेचा लाभ मिळणार नाही

**आदिती तटकरे यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेतून वगळण्यात येत आहे. अशी माहिती दिली आहे.**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी लाभदायक ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या बदललेल्या निकषांची माहिती एक्सवर दिली आहे. या नव्या निकषांनुसार या योजनेतून पाच लाख महिला आता अपात्र ठरणार आहेत. जुलै २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेतील लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये थेट खात्यात दिले जात होते. आतापर्यंत योजनेचे सात हप्ते वितरीत करण्यात आले आहेत. फेब्रुवारी महिन्याचा हप्ता लवकरच देण्यात येणार आहे.

अपात्र ठरविण्यात आलेल्या निकषांप्रमाणे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या २,३०,००० महिलांना वगळण्यात आले आहे.

तसेच वय वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या १,१०,००० महिलांना योजनेतून अपात्र ठरविले गेले आहे. कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या आणि स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १,६०,००० महिला आहेत. यानुसार एकूण पाच लाख महिला आता अपात्र ठरल्या आहेत.

विधानसभा निवडणुकांआधी जाहीर केलेल्या अनेक योजनांचा मोठा आर्थिक ताण शासकीय तिजोरीवर येत असल्याची ओरड होत होती.

यासाठी इतर योजनांचा निधी कमी केला असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. तसेच अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर शिवभोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या दोन योजना बंद करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती.

# बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी एस. व्ही. आर. श्रीनिवास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापकपदी एस. व्ही. आर श्रीनिवास यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीनिवास यांनी गुरुवार, ६ फेब्रुवारी रोजी महाव्यवस्थापक पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला असून ते १९९१ च्या तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेशी संबंधित नगर संरचना, शहरी वाहतूक, मेट्रो रेल्वे आणि नगर नियोजन या विभागांमध्ये श्रीनिवास यांनी काम केल्यामुळे त्यांना संबंधित विभागांचा अनुभव आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आदींमध्ये वरिष्ठ पदावर त्यांनी काम केले आहे.

सध्या ते धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. श्रीनिवास यांनी नगर नियोजन



आणि शहरी गृहनिर्माण (नूतनीकरण), वित्त, शहरी पायाभूत प्रकल्प, संरचना, नियोजन आणि अंमलबजावणी यासारख्या महत्वाच्या पायाभूत विभागांमध्ये सर्वोच्च पदे भूषवली आहेत. तसेच, मेगा गृहनिर्माण प्रकल्प उभारणीमध्ये मोलाचा हातभार लावला आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय निधी एजन्सी आणि जागतिक कोर्पोरेट्स संस्थांमध्येही सहभाग घेतला आहे.

बेस्टच्या महाव्यवस्थापकीय पदी असलेले विजय सिंघल यांची केवळ नऊ महिन्यात फेब्रुवारी २०२४ मध्ये त्यांची सिडकोमध्ये बदली झाली. त्यानंतर बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी मार्च २०२४ मध्ये अनिल डिग्गीकर यांची नियुक्ती करण्यात आली होती.

कुर्ला बेस्ट बस अपघातानंतर डिग्गीकर यांच्या कामकाजावर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण झाली. या प्रकरणात तत्परतेने काम न केल्यामुळे १५ डिसेंबर २०२४ रोजी त्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली. त्यांनतर काही दिवस महाव्यवस्थापक पद रिक्तच होते. त्यानंतर डॉ. हर्षदीप कांबळे यांची महाव्यवस्थापक पदावर नेमणूक झाली. मात्र, या बदलीबाबत नाराज असलेल्या कांबळे यांनी महाव्यवस्थापक पदाचा कार्यभारच स्वीकारला नव्हता. अखेर आता या पदाचा कारभार एस. व्ही. आर श्रीनिवास यांनी स्वीकारला आहे.

म्हाडा नाशिक मंडळाच्या ४९३ घरांच्या अर्जविक्री-स्वीकृतीस सुरुवात, ७ मार्चपर्यंत अनामत रक्कमेसह अर्ज सादर करता येणार

गेल्या तीन वर्षात महाव्यवस्थापक पदावर चार आयएएस अधिकारी येऊन गेले. मात्र, कुणाचाही कार्यकाळ पूर्ण झाला नाही. त्यामुळे बेस्ट उपक्रमात ठोस नियम आणि धोरणांची अंमलबजावणीच झाली नाही. दरम्यान, महापालिकेच्या अर्थसंकल्पात आगामी वर्षात बेस्ट उपक्रमासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे नवीन महाव्यवस्थापक बेस्ट उपक्रमात काय बदल करतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. श्रीनिवास यांनी मेट्रो रेल्वे प्रकल्प, मुंबई ट्रान्स हार्बर सी लिंक, शहरी पाणीपुरवठा प्रकल्प बोगदे आणि उन्नत रस्ते, नगर नियोजन, मुंबई आणि इतर शहारांतील परवडणारी गृहसंकुले, गृहनिर्माण धोरण, धारावी पुनर्विकास प्रकल्प आदींमध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे.




# मोघरपाडा कारशेड उभारणीत भूमिपुत्रांवर अन्याय होऊ देणार नाही

## – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा नियोजन समिती सभागृहात मोघरपाडा कारशेड डेपो मेट्रो मार्गिका संदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज शेतकऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा संपन्न झाली. या बैठकीत जिल्हाधिकारी श्री.अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त अश्विन मुद्गल, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, जिल्हा भूमी अधीक्षक बाबासाहेब रेडकर, तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी तसेच प्रकल्पबाधित शेतकरी उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उपस्थित बाधित शेतकऱ्यांसोबत चर्चा करताना शासनाने या संदर्भात घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. मौजे मोघरपाडा, सर्व्हे नं.30 मधील 167 भाडेपट्टेधारक शेतकरी व 31 अतिक्रमणधारक शेतकरी यांना विशेष नुकसान भरपाई योजना म्हणून शासनाने धोरण तयार केले असून शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्रात पहिल्यांदाच अशा प्रकारची सुयोग्य भरपाईची योजना राबविली आहे. मौजे मोघरपाडा, सर्व्हे नं.30 येथील 174.01 हे.आर. जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. जमिनीवरील पट्टेधारक शेतकरी तसेच अतिक्रमण धारकांची पात्रता जिल्हाधिकाऱ्यांनी निश्चित केली आहे. विकसित भूखंडासाठी सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन आहे तसेच ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन नाही परंतु कब्जा आहे. ही जमीन शासनाची असेल तर नवी मुंबई क्षेत्रात देणात येणाऱ्या शेतकऱ्यांना मालकी हक्क संदर्भात राज्यात जो मोबदला धोरण राबविले आहे.

ज्या शेतकऱ्यांच्या नावावर 7/12 आहे, त्यांना 22.5 टक्के मोबदला शासनाच्या नियमानुसार देण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांचे नाव नाही परंतु अतिक्रमण कब्जा आहे व ती जमीन शासनाची आहे, त्या ठिकाणी 12.5 टक्के शासनाच्या नियमानुसार मोबदला देण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांना योग्य तो मोबदला निश्चित देण्यात येणार आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याचे हे राज्यातील पहिलेच उदाहरण आहे. त्यासंदर्भात त्यांना कशा प्रकारचा मोबदला म्हणजे वस्तूनिहाय प्लॉट, तेथील रस्ते, गटारे, भूखंड, इलेक्ट्रॉनिक पोल, शेतकऱ्यांस कसा फायदा होईल व पुनर्वसन कसे होईल, याविषयी देखील त्यांनी सांगितले. यावेळी एमएमआरडीएचे विकास पाटील यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे या शेतकऱ्यांना शासनाकडून कोणते लाभ देण्यात येणार आहेत, याविषयी सविस्तर माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. तसेच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे मनपा आयुक्त सौरभ राव व एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त अश्विन मुद्गल यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले की, सर्व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला नक्की दिला जाईल. शासनाच्या प्रकल्पासाठी शेतकरी करीत असलेल्या सहकार्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांचे अभिनंदनही केले, त्यांचे आभार मानले.

# वागळे इस्टेट भागात आढळला बाळाचा मृतदेह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : येथील वागळे इस्टेट भागातील किसन नगर परिसरात एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील खिडकीच्या छतावर एका बाळाचा मृतदेह आढळल्याचा प्रकार गुरुवारी उघडकीस आला आहे. या प्रकरणाची नोंद श्रीनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे. किसन नगर परिसरात एक इमारत आहे. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील एका रूमच्या खिडकीवर दोन ते तीन दिवसाचे बाळ (मुलगा) मृत अवस्थेत पडल्याचे इमारतीच्या रहिवाशांना आढळून आले. त्यांनी या घटनेची माहिती श्रीनगर पोलीस ठाण्यात दिली. माहिती मिळताच श्रीनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बाळाचा मृतदेह ताब्यात घेतला

# वाढवण बंदराला स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव द्या – आमदार निरंजन डावखरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर: पालघर जिल्ह्यात नव्याने होणाऱ्या वाढवण बंदराला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव द्या, मनोर बर्न सेंटर त्वरित कार्यान्वित करा, पालघर जिल्ह्यातील सर्व शाळांचे ऑडिट करा, डहाणू येथील कासा आणि जव्हार उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी मशीनसाठी टेक्निशियन उपलब्ध करुन द्या, अशा आग्रही मागण्या आमदार निरंजन डावखरे यांनी पालघर येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केल्या.

पालघर येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री आणि पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक अध्यक्षस्थानी तर प्रमुख विविध मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी कोकण



पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी पालघर जिल्ह्यातील अनेक प्रलंबित आणि महत्त्वाच्या समस्यांकडे लक्ष वेधले.

मनोर येथे उभारण्यात आलेल्या बर्न सेंटरच्या वास्तूचे काम पूर्ण झाले असून आवश्यक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीअभावी हे केंद्र अद्याप कार्यान्वित नाही. आमदार डावखरे यांनी तातडीने डॉक्टर आणि अन्य आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून हे केंद्र सुरू करण्याची मागणी केली. अधिकाऱ्यांनी कार्यभार स्वीकारताच हे बर्न सेंटर अनेक रुग्णांसाठी वरदान ठरेल, अशी माहिती आमदार डावखरे यांनी दिली.

जिल्ह्यात अनेक शाळांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव आढळतो आणि म्हणून या सर्व शाळांचे एक ऑडिट करणे आवश्यक आहे असे डावखरे यांनी बैठकीत नमूद केले. डहाणू येथील जिल्हा परिषद शाळा, मल्याण मराठी येथे विद्यार्थिनींच्या आरोग्याची काळजी घेत शौचालय दुरुस्तीची मागणी आमदार डावखरे यांनी केली.

डहाणू येथील कासा आणि जव्हार उपजिल्हा रुग्णालयात लाखो रुपयांच्या सोनोग्राफी मशीन आहेत, मात्र टेक्निशियन नसल्यामुळे त्या निष्क्रिय आहेत. परिणामी, रुग्णांना खासगी रुग्णालयात अधिक खर्च करून तपासण्या कराव्या लागत आहेत. हा अन्याय दूर करण्यासाठी त्वरित टेक्निशियनची नियुक्ती करावी, अशी आग्रही मागणी आमदार डावखरे यांनी केली.

पालघर जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये रोस्टर तपासणी त्वरित करण्यात यावी, जेणेकरून विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, असे आमदार डावखरे यांनी सांगितले. न्यायालयाच्या निर्णयानुसार या प्रक्रिया पारदर्शक आणि सुयोग्य पद्धतीने पार पडाव्यात, यावर त्यांनी भर दिला.

डिजिटल शाळा, आदर्श शाळा आणि नावीन्यपूर्ण योजना व इतर काही योजनांसाठी मार्चपर्यंतचा खर्च शून्य असल्याचे समोर आले. ही अत्यंत गंभीर बाब असून, संबंधित विभागाने यावर स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी आमदार डावखरे यांनी केली.

पालघर जिल्ह्यात नव्याने होणाऱ्या वाढवण बंदराला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव द्यावे, असा प्रस्तावही आमदार डावखरे यांनी ठेवला. या प्रस्तावाला उपस्थित सदस्यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. पालघर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार निरंजन डावखरे यांनी मांडलेल्या मागण्या महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# ठाणे महापालिका इमारत बांधकामाला नागरिकांचा विरोध

## पालिका भवनासाठी बदलले उद्यानाचे आरक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

रहिवाशांचा तीव्र विरोध डावलून राज्य सरकारने रेमंड येथिल उद्यानाचे आरक्षण बदलल्याने रेमंड येथिल रहिवाशी प्रचंड संतापले आहेत. आरक्षण बदलण्याच्या या निर्णयाविरोधात ते न्यायालयात धाव घेणार आहेत. एकूणच ठाणे महापालिकेच्या मुख्यालयाच्या नवीन इमारतीचे काम वादाच्या भोवऱ्यात अडकण्याची भीती व्यक्त केली जात आहे

रेमंड येथिल महापालिकेच्या ३.५ हेक्टर क्षेत्रावर सुविधा भूखंडावर मुख्यालयासाठी ३२ मजल्यांची इमारत बांधण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ७८५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचे भूमिपूजन झाले होते. हे मुख्यालय प्रथम महापालिकेच्या सुविधा भूखंडावर रेमंड डेव्हलपरने ही इमारत स्वखर्चाने बांधून देणे अपेक्षित होते, परंतु सुविधा भूखंडाऐवजी उद्यानाकरिता आरक्षित असलेल्या भूखंडावर या मुख्यालयाची इमारत बांधण्याचा घाट महापालिकेने घातला असून त्याला या भागातील नागरिकांनी तीव्र विरोध केला होता.

उद्यान असल्याचे पाहून अनेकांनी घर खरेदी केले होते, परंतु ते उद्यानच होणार नसल्याने रेमंड येथिल नागरिकांनी महापालिका भवनाच्या इमारतीच्या बांधकामाला विरोध सुरु केला आहे.

या भागात असलेल्या उद्यानाचे आरक्षण 3 ऑक्टोबर २०२४ रोजी बदलण्यात आले असून त्यावर उप सचिव निर्मलकुमार चौधरी यांची सही आहे. या अध्यादेशाबाबत येथिल नागरिकांना अंधारात ठेवण्यात आले असल्याचा आरोपी येथिल नागरिक करत असून महापालिकेचे अधिकारी देखिल आरक्षण बदल केल्याचा अध्यादेश उपलब्ध करून देत नसल्याचा आरोप करत आहेत.

आरक्षण ३७ (१) नुसार हे आरक्षण बदली करण्यात आले होते. ते नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देणे आवश्यक होते, परंतु ते उपलब्ध करून दिले नाही, असा देखिल आरोप केला जात आहे. हे आरक्षण बदली करण्यात आल्यामुळे मुख्यालय इमारतीच्या कामातील अडथळा दूर झाला असून महापालिकेने या उद्यानाच्या जागेतील हजारो झाडे तोडून तसेच पुनररोपण करण्याचा देखिल निर्धार केला आहे. महापालिकेच्या या निर्णयाविरोधात या भागातील नागरिक न्यायालयात धाव घेणार आहेत, त्यामुळे मुख्यालय इमारतीचे भवितव्य काय असेल ते भविष्यात स्पष्ट होणार आहे.

या बाबत महापालिकेच्या शहर विकास विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

आरक्षण बदलाच्या अध्यादेशामध्ये ०.३७ पडीक जमिन दाखवली असून ती जमिन नैसर्गिक नाला बुजवून तयार केली असल्याचे एका नागरिकांने सांगितले.

# जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना सहा एप्रिलची मुदत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एसईबीसी) आणि मागास प्रवर्गातून (ओबीसी) २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने ६ एप्रिल २०२५ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा दिली आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारावर प्रवेश निश्चित केले होते. अशा विद्यार्थ्यांना यामुळे दिलासा मिळाला आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात राबविलेल्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची पावती प्रवेश घेताना सादर केली होती. या पावतीच्या आधारावर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले होते. या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली होती. पावतीच्या आधारे ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता, त्यातील काही विद्यार्थ्यांनी विहीत कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले. अनेकांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे शक्य झालेले नाही. अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने विद्यार्थ्यांना ६ एप्रिल २०२५ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा दिली आहे. अद्याप जात वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशा विद्यार्थ्यांनी संबंधित जात पडताळणी कार्यालयाशी संपर्क साधावा आणि दिलेल्या मुदतीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून ते ऑनलाईन राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर अपलोड करावे. तसेच संबंधित संस्था किंवा महाविद्यालयात जमा करावे, त्याचप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र संस्थेत किंवा महाविद्यालयात जमा केले आहे, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन अपलोड करण्यात आले आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी, अशा सूचना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात आल्या आहेत.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीच ही सवलत आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी एसईबीसी आणि ओबीसी संवर्गातून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सवलत मिळणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळेत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, असेही राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



# केडीएमसीच्या फ प्रभागातील मालमत्ता सिल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली (पूर्व) फ प्रभागातही काल कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली थकबाकी रक्कमेपोटी निवासी मालमत्ता व बिगर निवासी मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई करण्यात आली.

फ प्रभागाच्या सहा.आयुक्त हेमा मुंबरकर, अधिक्षक महेश पाटील, वरिष्ठ लिपिक दौलत जांभेकर, लिपिक शशिकांत म्हात्रे यांच्या पथकामार्फत डोंबिवली (पूर्व) खंबालपाडा कल्याण रोड येथील कोळीवाडा हॉटेल हे रक्कम रु.1 लाख 73 हजार 272 थकबाकीपोटी सिल करण्यात आले. तसेच डोंबिवली (पूर्व) रेल्वे कॉलनी, कल्याण रोड सद्गुरू बिल्डिंग मधील विकासक जगदीश वाघ यांच्या मालकीचे असलेल्या दोन सदनिका क्रमांक 401, 701 या रक्कम रु. 20 लाख 96 हजार 433 इतक्या थकबाकी पोटी सिल करण्यात आल्या.



# वसंतराव पाटील 'स्मृतीगंध' पुरस्काराची घोषणा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पारनेर : वासुंदे - पारनेर तालुक्याचे स्वर्गीय वसंतराव झावरे पाटील यांचे ९ वे पुण्यस्मरणाच्या निमित्ताने पारनेर तालुक्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ६ जणांना शनिवार, दि ८ फेबुवारी रोजी वासुंदे येथे सकाळी १० वाजता मान्यवरांच्या हस्ते व उपस्थित देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व देवकृपा फाऊन्डेशन चे अध्यक्ष सुजितराव झावरे पाटील यांनी दिली .

संपूर्ण आयुष्य निष्कलंक व्यक्तिमत्व म्हणुन पारनेर तालुक्यातील जनतेच्या मनावर अधिराज्य गाजविणारे स्वर्गीय आमदार वसंतराव दादा झावरे पाटील हे सर्वच लोकांचे प्रेरणास्थान आहे.

पारनेर तालुक्यातील काळु मध्यम प्रकल्प, भांडगाव मध्यम प्रकल्प, शिवडोह मध्यम प्रकल्प, पिंपळगाव जोगे कॅनॉल, मांड ओहळ धरण कालवा, पारनेर येथील शासकीय आरोग्य केंद्र, ४ विदयुत सबस्टेशन, आदिवासी व धनगर समाजासाठी त्यांचे योगदान हे महत्वपुर्ण मानले जाते. त्यांच्या ९ व्या पुण्यस्मरण कार्यक्रमानिमित्त देवकृपा फौउंडेशन व वासुंदे ग्रामस्थांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सकाळी १०.०० वाजता प्रसिद्ध समाजप्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज इंदोरीकर देशमुख यांचे किर्तन आहे.

देवकृपा फौउंडेशनच्या वतीने स्वर्गीय आमदार वसंतराव झावरे पाटील स्मृतीगंध पुरस्कार विविध क्षेत्रातील ६ मान्यवरां मध्ये अध्यामिक क्षेत्रातील वैराग्यमुर्ती हभप डॉ. नारायण महाराज जाधव , कृषि क्षेत्रातील जवळयातील प्रगतशिल शेतकरी सुभाष गोरक्षनाथ पठारे , औदयोगिक क्षेत्रातील कन्हैय्या परिवाराचे संस्थापक स्वर्गीय शांताराम मामा लंके यांना मरणोत्तर देण्यात येणार आहे .
शेत पाणंद रस्ते चळवळीच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारे नारायण गव्हाण चे शरद भाऊसाहेब पवळे , शैक्षणिक क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तीमहत्व असलेले सेवाभावी मुख्याध्यापक सुभानजी कृष्णा खैरे , कला क्षेत्रात प्रसिद्ध असलेले वासुंदयाचे संतोष पांडुरंग क्षीरसागर , साहित्य क्षेत्रात प्रसिद्ध लेखक गारखिंडी चे देवा गोपीनाथ झिंझाड यांना सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात येणार आहे. तदनंतर महाप्रसादाचा सर्वांनी लाभ घ्यावा , असे आवाहन देवकृपा फाऊन्डेशन चे अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील व वासुंदे ग्रामस्थांनी केले आहे.

# १० वर्षात ठाणे बनणार देशातील आदर्श शहर


## – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे शहरात आणि जिल्ह्यात अनेक विकास कामे प्रगतीपथावर आहेत. या पार्श्वभूमीवर पुढील दहा वर्षात ठाणे शहर केवळ राज्यातीलच नव्हे तर देशातील आदर्श शहर बनणार यात शंकाच नाही, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज येथे व्यक्त केला.

क्रेडाई एमसीएचआय ठाणे आयोजित 22 व्या रिअल इस्टेट आणि हौसिंग फायनान्स एक्स्पो चे उद्घाटन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, एमएमआरडीए चे अतिरिक्त आयुक्त अश्विन मुद्गल, क्रेडाई चे अध्यक्ष जितेंद्र मेहता, डॉमनिक रोमेल, अजय आशर , स्टेट बँक ऑफ इंडिया चे उप महाव्यवस्थापक सुरजित त्रिपाठी, स्थानिक लोकप्रतिनिधी संजय भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

परिवहन मंत्री पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि आत्ताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्याच्या विकासात्मक प्रकल्पांसाठी सर्वात जास्त निधी



उपलब्ध करून दिला आहे. ठाणे शहराचा आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच एकमेव ध्येय आहे. वाहतूक कोंडीचे वास्तव नाकारता येणार नाही मात्र त्याबाबतीत लवकरच उपाययोजना करण्यात येणार आहेत.

ते पुढे म्हणाले, गायमुख ते दहिसर मेट्रो, गायमुख घाट रस्त्याचे कॉंक्रीटीकरण,घोडबंदर परिसरातील अंतर्गत रस्त्यांची कामे, नागला बंदर खाडी किनारा विकास प्रकल्प, मॅंग्रोव्ह पार्क अशी विविध कामे सुरु आहेत किंवा होणार आहेत. पुढील दहा वर्षात ठाणे शहर केवळ राज्यातीलच नव्हे तर देशातील एक विकसित आदर्श शहर बनणार यात शंकाच नाही.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रेडाई चे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी केले. तसेच याप्रसंगी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी मनोगत व्यक्त करताना ठाणे जिल्ह्याच्या विकासात प्रशासनाचे योगदान याविषयी उपस्थितांना माहिती दिली. तर ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती दिली. त्याचबरोबर ठाणे शहरातील विकासात क्रेडाई एमसीएचआय ची भूमिका श्री.अजय आशर यांनी विस्तृतपणे मांडली.

# शिवसेनेच्या बाल महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

कल्याण : कल्याण पश्चिमेत आयोजित करण्यात आलेल्या बाल महोत्सवाला शालेय विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. शिवसेना कल्याण शहर शाखा आणि रवी पाटील फाऊंडेशनच्या माध्यमातून येथील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणावर हा महोत्सव संपन्न झाला. यंदाच्या महोत्सवाचे हे 3 रे वर्ष होते.




राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संसदरत्न पुरस्कार प्राप्त कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गेल्या तीन वर्षांपासून रवी पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक. भाग म्हणून आयोजित या बाल महोत्सवामध्ये कल्याणातील शाळांनी मोठा सहभाग घेतला. मराठी, हिंदी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील शेकडो विद्यार्थी या बाल महोत्सवात सहभागी झाले होते अशी माहिती आयोजक आणि शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांनी दिली.

यावेळी चित्रकला, निबंध लेखन, रांगोळी आणि नृत्य अशा विविध स्पर्धा भरवण्यात आल्या. ज्यामध्ये देण्यात आलेल्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक विषयांवर विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदररित्या आपली कल्पनाशक्ती सादर केल्याचे दिसून आले. इतकेच नाही तर या मुलांसोबत त्यांचे अनेक पालकांनीही या बाल महोत्सवात हिरीरीने सहभाग घेत आपल्यातील बालपणाला पुन्हा एकदा उजाळा दिला. गुरुवारी सायंकाळी या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यावेळी विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाला शिवसेनेच्या उपनेत्या विजया पोटे, जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, शहरप्रमुख रवी पाटील, माजी महापौर वैजयंती गुजर घोलप, उपशहरप्रमुख मोहन उगले, सुनिल वायले, महिला शहर संघटक नेत्रा उगले, माजी नगरसेवक मयूर पाटील, गणेश जाधव, विणा जाधव, युवासेनेचे अनिरुद्ध पाटील यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आता अमेरिकेतही आगरी भाषेचा डंका

## अलिबागची पाटीलनबाई समाजमाध्यमात व्हायरल




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मराठीच्या बोली भाषा जपल्या तर आपोआप मराठी भाषा टिकेल आणि स्थानिकांनी आपली बोली भाषा सोडली वा प्रमाण भाषेत बोलणाऱ्यांनी नेहमी बोली भाषेत बोलणाऱ्यांना कमी लेखत आले म्हणून त्यांना सोडावी लागली असे म्हणत सर्वेश तरे यांनी 'आगरीन बोला' चॅलेंज हा उपक्रम सुरु केला आहे.

या उपक्रमात ते स्वतः विविध दुकानदारांशी अन इतर मंडळींशी आगरी बोलीत बोलून त्यावर समोरच्यांची काय प्रतिक्रिया मिळते हे पाहिली अन समोरच्यांनी सुध्दा आगरी बोलीत बोलुन सकारात्मक प्रतिसाद दिला. याच अनुषंगाने मुळ गडब-पेणच्या अन सध्या अमेरिकेतील फ्लोरिडा या शहरात स्थायिक असलेल्या उज्वला पाटील यांनी आगरीन बोला चॅलेंज उपक्रमात सहभाग घेतला असुन त्या समाजमाध्यमात आगरी भाषेत बोलून सध्या 'पाटील इन अमेरिका' अन 'अलिबागची पाटलीन' नावाने गाजत असुन त्यांचे तब्बल ३८ हजार फोलोवर्स झाले आहेत.
उज्वला पाटील या उच्चशिक्षित असुन एमबीए, हॉस्पिटल मॅनेजमेंट आणि टेक्नॉलॉजीमध्ये पदवी मिळवली आहे. सध्या त्या अमेरिकेत सॉफ्टवेअर टेस्टर आणि प्रोग्रामर म्हणुन काम करीत आहेत. नुकताच त्यांनी #आगरीनबोलाचॅलेंज उपक्रमात सहभाग घेऊन आगरी भाषेत पाककृतीचा व्हिडीओ त्यांच्या इन्स्टाग्राम समाज माध्यमात टाकून 'अमेरिकेशी मी आगरी भाशा जपाचा प्रयत्न करते,आपली आगरी-कोळी भाशा जपाची आसल त जापालाच लागल' असे म्हणत आपली बोली भाषा बोलण्याचा अन जपण्याचा त्यांनी संदेश दिला आहे.

# तरुणांना अंधश्रद्धा निर्मूलन, एडस जनजागृती कार्यशाळा संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : श्रीजया आनंद कॉमर्स आणि सायन्स नाईट डिग्री कॉलेज ठाणे आणि कल्याण शाखा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या विद्यमाने, पानखंडा गाव, ओवळे येथे कॉलेजच्या एनएसएस कॅम्प मध्ये तरुणांना मार्गदर्शन करण्यात आले.

माजी राज्यसचिव सुशीला मुंडे यांनी अंधश्रद्धा निर्मूलनची गरज काय? दैनंदिन जीवनात आपण कसे अंधश्रद्धेच्या आहारी जातो? आपला विवेक जागृत ठेवण्यासाठी आपण काय केले पाहिजे? हे तरुणांना सांगितले. प्रधान सचिव जिल्हा ठाणे डॉ.सुषमा बसवंत यांनी एच आय व्ही एड्सबाबत विद्यार्थ्यांना जागरूक केले. एचआयव्ही एड्स चा प्रादुर्भाव कसा होतो? तो कसा टाळावा? आणि निरोगी जीवनशैली कशी आत्मसात करावी, याचे तरुणांना धडे दिले. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा विशेष अंक आणि कॅलेंडर कॉलेजला भेट देण्यात आले. प्रा.विनीत, प्रा.कवडे आणि जाधव यांचे या कार्यक्रमाला सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला होता.अनिसची सध्या सभासद नोंदणी सुरू आहे, त्यासाठी देखील तरुणांचा उत्साह दिसला.

# ॲग्री स्टॅक योजनेसाठी शेतकऱ्यांनी नोंदणी करा

## मुरबाड कृषी खात्याचे आवाहन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड :ॲग्री स्टॅक हि नवीन योजना शेतकऱ्यांसाठी आली यावरील सर्व माहिती द्या .व सर्व शेतकरी बांधव यांना आपल्या नजीकच्या सीएसटी( CSC) सेंटर,आपले सरकार येथे आपला सातबारा उतारा व आधार कार्ड घेऊन जाऊन नोंदणी करण्याचे आवाहन मुरबाड तालुका कृषी अधिकारी नामदेव धांडे यांनी केले आहे.

# पेण मराठी साहित्य मंडळाच्या अध्यक्ष पदी डॉ.देविदास बामणे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : मराठी साहित्य मंडळ पेण ही संस्था स्व.पुरोहित गुरुजी यांनी 1962 साली स्थापन केली असून तेव्हापासून साहित्यिक उपक्रम सतत आयोजित करत आलेली आहे.साहित्यिक व्याख्याने ,चर्चा ,कवीसंमेलने ,विविध स्पर्धा,पोवाडा,मुलाखत, साहित्य संमेलने इ.कार्यक्रमांचे आयोजन करून साहित्यिक आणि पेणचे साहित्य रसिक यांच्या मधील मराठी साहित्य मंडळ पेण ही संस्था महत्वाचा दुवा बनली आहे.अशा नावजलेल्या संस्थेची नवीन कार्यकारणी नुकतीच गठीत करण्यात आली असून नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून डॉ.देवीदास बामणे यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्ष प्रा. सतीश पोरे सचिव वैभव धनावडे खजिनदार अश्विनी गाडगीळ सह कार्यवाह सुप्रिया लिमये तर सदस्य म्हणून मोहिनी गोरे ,विनायक गोखले म्हणून काम पाहणार आहेत.

अनेक वर्ष संस्थेच्या अध्यक्षा म्हणून भूमिका बजावलेल्या विभावरी जोशी आणि कार्यवाह बाळकृष्ण कमळकर यांच्या सातत्यपूर्ण साहित्य चळवळीतून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम पार पडले असून त्यांनी नवीन कार्यकारणीस जवाबदारी सोपवताना आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि आपले मार्गदर्शन आणि सहकार्य नवीन कार्यकारणीस नेहमीच असेल ह्याची ग्वाही दिली.

# शिवचरित्र ऐकून जीवन जगण्याला ऊर्जा मिळते

## – प्र. सरपंच प्रताप पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र ऐकणे म्हणजे जीवन जगण्याला मोठी ऊर्जा मिळते. शिवरायांचे आचार, विचार, पराक्रम, रयतेवरील राजांचं प्रेम, युद्ध तंत्र, या सर्व गोष्टी आपणाला प्रचंड ऊर्जा आणि आनंद देणाऱ्या आहेत. शिवराय आपल्या प्रत्येकाच्या हृदयात असल्याचे उद्गार प्र. सरपंच प्रताप पाटील यांनी काढले.

जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे शिवचरित्र पारायण सुरू आहे. शिवचरित्र पारायणाचे हे चौथे वर्ष आहे याचा विशेषत्वाने मला आनंद होत असल्याचे मत प्रताप पाटील यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे




तीन फेब्रुवारी पासून शिवचरित्र पारायणाला सुरूवात झाली आहे. शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांनी शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र आणि संतांची कामगिरी ही कथा विद्यार्थ्यांसमोर कथन केली. शिक्षक अंकुश ठाकरे यांनी छत्रपती शिवरायांचा जन्म ही कथा सांगितली. सध्या जगताप यांनी शिवरायांचे बालपण ही कथा सांगितली. चित्रा पाटील यांनी स्वराज्याची शपथ ही कथा सांगितली. तर माया सोनकांबळे यांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले ही कथा सांगितली.

या उपक्रमाची संकल्पना शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांची आहे. तीन फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या शिवचरित्र पारायण एकोणीसवीस फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ढोल, ताशा, लेझीम च्या गजरात संपूर्ण गावातून राजांची मिरवणूक काढून शाळेमध्ये विविध कार्यक्रम घेतले जाणार आहेत. सरपंच प्रताप पाटील यांनी सांगितलं की, राहनाळ ग्रामपंचायतीच्या प्रांगणामध्ये मोठ्या जल्लोषात शिवजयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. या उत्सवामध्ये पोवाडे, नृत्य, नाटक, व्याख्याने असा भरगच्च कार्यक्रम सादर केला जाणार आहे.
शिवचरित्र पारायणावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा घेतली जाणार आहे. तसेच शनिवारी राजांचा चित्रपट दाखविला जाणार आहे. या शिवचरित्र पारायणाची चर्चा संपूर्ण पंचक्रोशी मध्ये सुरू आहे.

# श्रमजीवी संघटनेचे आंदोलन सूरूच

## वनअधिकारी स्थल पाहणीकरीता पोहचले जमिनीवर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अनगांव : वनपट्टे मिळविण्यासाठी श्रमजीवी संघटनेने सोमवार पासून भिवंडी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निर्णायक आंदोलन पाचव्या दिवशीही सूरूच आहे, शूक्रवारी संघटनेचे अध्यक्ष रामभाऊ वारणा , उपाध्यक्ष दत्तात्रेय कोलेकर, सरचिटणीस बाळाराम भोईर,विजय जाधव, पालघर जिल्हा अध्यक्ष सूरेश रेंजड, ठाणे जिल्हा अध्यक्ष अशोक सापटे यांनी आंदोलकांची भेट घेऊन मार्गदर्शन केले, पाचव्या दिवशी प्रशासनाने वनअधिकारी ,तलाठी, ग्रामसेवक, वनसमिती अध्यक्ष वनसमिती सचिव,व दावेदार,यांनी वनजमिनींवर जाऊन पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे, जो पर्यंत आदिवासींना त्यांच्या हक्काची वनजमिन मिलत नाही तोपर्यंत हे आदोलन सूरू राहणार असल्याचे अध्यक्ष रामभाऊ वारणा यांनी मार्गदर्शन करताना केले.

# मधुक्रांतीसाठी लोकचळवळीची आवश्यकता

## - रवींद्र साठे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : भविष्यात मधु पर्यटनसारखा (हनी टुरिझम) प्रकल्प राबवून देश-विदेशातील पर्यटकांना महाबळेश्वरकडे आकर्षित करण्याचे प्रयत्न केले जातील, असे सांगून मधमाश्यांच्या संवर्धनासाठी लोकचळवळ उभी राहिली पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योगचे सभापती रवींद्र साठे यांनी केले. 'एव्हरेस्ट' उद्योग समूहाच्या सहकार्याने व राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या पुढाकाराने महाबळेश्वर येथे 'मधुबन' हा प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांच्या हस्ते अलीकडेच करण्यात आले. यावेळी मधपाळांना व ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना साठे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सीईओ गीतांजली बावीस्कर, सहमुख्य कार्यकारी अधिकारी रेश्मा माळी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बिपीन जगताप, रामबंधू मसालेचे हेमंत राठी व एव्हरेस्टच्या वतीने रवींद्र गांधी उपस्थित होते.

राज्याच्या एकूण क्षमतेच्या केवळ 7 ते 8 टक्के आज महाराष्ट्रात मध उत्पादन होते. हे मध उत्पादन वाढण्यासाठी खादी मंडळ प्रयत्नशील आहे. मध गोळा करण्यासाठी व मधपाळ तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्यात आले पाहिजे. मधकेंद्र योजनेच्या माध्यमातून मंडळ हे काम करत आहे. आपल्याकडे मध हे सोनं आहे; परंतु त्याचा आपण हवा तेवढा प्रचार व प्रसार करीत नाही. भविष्यकाळात मधमाश्यांच्या संवर्धनाची लोकचळवळ उभी राहिली तर महाराष्ट्रात मधक्रांती झाल्याशिवाय राहणार नाही. इस्त्रायलप्रमाणे आपल्याकडे मधपाळांचा डेटा उपलब्ध नाही. राज्यातील प्रत्येक मधपाळांची नोंद करून राज्यात किती मधपाळ आहेत याची माहिती वेबसाईटवर दिली पाहिजे. देशात कोठेच मधसंचालनालय नाही ते केवळ महाराष्ट्रात आहे. महाबळेश्वर येथील मधसंचालनालयाचा वर्धापनदिन साजरा झाला पाहिजे. २० मे हा जागतिक मधपाळदिन म्हणून साजरा केला जातो. यंदा या दिवशी राज्यातील सर्व मधपाळांना एकत्रित करून मधपाळांचे महाअधिवेशन भरविण्याची सूचना रवींद्र साठे यांनी केली. महाबळेश्वर येथील मध संचालनालय पुढील काळात 'सेंटर ऑफ एक्सलंस करण्याची मंडळाची कल्पना आहे. त्यादृष्टीने इथे झालेले मधुबन ही एक छोटी सुरूवात आहे. मधमाशी व मधमाशीपालन या विषयी अधिकाधिक प्रबोधन होण्याची आवश्यकता साठे यांनी प्रतिपादित केली. अशाच प्रकारचे दुसरे मधुबन येत्या काळात बोरिवली, मुंबई येथील संजय गांधी राष्ट्रीय उदयानात होणार असल्याची माहिती साठे यांनी दिली. अमेरिका आणि चीनमध्ये मधमाश्यांचे विष गोळा केले जाते. हे विष एक कोटी रुपये किलो या भावाने विकले जाते. दुर्धर आजारावर हे विष गुणकारी आहे. भविष्यात खादी व ग्रामोद्योगमंडळाच्या वतीने अशाप्रकारे विष गोळा करता येते का, याचा राज्यशासन गांभीर्याने विचार करीत आहे. अशी माहिती मंडळाचे सभापती साठे यांनी दिली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024